Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# भगवानबाबांचे सामाजिक कार्य : एक अभ्यास

**युवराज भास्करराव मुंडे**
संशोधक विद्यार्थी
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

## प्रस्तावना

महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा करून समाजाला योग्य ती दिशा दाखविण्याचे कार्य १२ व्या शतकांपासून संतानी केले आहे. यामध्ये संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत गोरोबा, संत सावता, संत चोखामेळा, संत सेना, संत नरहरी, संत विसोबा, संत कर्ममेळा, संत बंका, संत एकनाथ, संत जगन्मित्र नागा, संत तुकाराम, संत रामदास, संत निळोबा यांच्याबरोबरच संत मुक्ताई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत वेणाबाई इत्यादींचा समावेश करता येईल. मध्ययुगीन कालखंडापासून संस्कृती संवर्धनाचे हे सामाजिक कार्य आजही अखंडपणे चालू आहे. संत तुकाराम-निळोबानंतर महाराष्ट्रातील ही समाजप्रबोधनाची चळवळ काहीशी मंदावलेली दिसते. याचे कारण म्हणजे भारतावर परकियांचे आक्रमणे, नंतर देशातील इंग्रजांची सत्ता व हैद्राबाद संस्थानातील निजामी राजवट याही कारणीभूत ठरल्या. या परिस्थितीतून सावरण्याचे काम, भयभीत समाजाला त्यांच्या स्वत्वाची जाणीव करून देणे, त्यांच्यात लोकहिताची ओढ निर्माण करणे हे सर्व कार्य याच संत परंपरेचे पाईक असलेले पण आधुनिक कालखंडात आधुनिक पद्धतीने हे कार्य जोमाने पुढे घेऊन जाण्याचे काम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगेबाबा, कैकाडी महाराज, बंकटस्वामी, माणिकबाबा, मामासाहेब दांडेकर, तनपुरे महाराज, तसेच वंजारी समाजातील संतांमध्ये संत भगवान बाबा, संत वामनभाऊ महाराज, श्री संत नारायण महाराज आणि श्री संत खंडुजीबाबा या संताचे फार मोठे योगदान राहिले आहे. त्यांनी तत्कालीन भयभीत झालेल्या समाजाची नाळ ओळखून त्यांना आपलसं केले. त्यांची जीवनावश्यक अशी गरज बनलेल्या वाईट व्यसनांना परावृत्त केले. त्यांना भजन-कीर्तनाच्या माध्यमातून हे पटवून सांगितले. त्यामुळे या संतांचेही समाजमनात स्थान बळकट होत गेले.

कीर्तन आणि भजनाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचा ध्यास घेतलेले हे संत त्यांच्या निःस्वार्थ अशा अथक परिश्रमाला उत्तरोत्तर नाव लौकीक मिळत गेला. प्रस्तुत प्रकरणामध्ये वंजारी समाजातील संत

भगवान बाबा, संत वामनभाऊ महाराज, श्री संत नारायण महाराज आणि श्री संत खंडुजीबाबा या संतांच्या कार्याचा अभ्यास खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. भगवानबाबांचे सामाजिक कार्यातील अंधश्रद्धा निर्मूलन कार्याचा अभ्यास करणे.

२. भगवानबाबांचे सामाजिक कार्यातील जातीभेद निर्मूलनाचा अभ्यास करणे.

**भगवानबाबांचे सामाजिक कार्य**

संत भगवान बाबानी सामाजिक कार्य करीत असताना अंधश्रद्धा निर्मूलन, उपेक्षित वंचितांचे आधारवड, तंटामुक्ती आणि जातभेद निर्मूलन अशाप्रकारेचे कार्य केले. संत भगवानबाबांचा सामाजिक दृष्टिकोन हा अंधारात प्रकाश देण्यासारखा आहे, हे त्यांच्या जीवनकार्याची पार्श्वभूमी समजून घेतल्यानंतर लक्षात येते. कारण, त्या काळातील इंग्रज आणि निजाम सत्तेच्या दडपशाहीचा असलेला परिणाम, त्यातून खोलवर रुजलेली अंधश्रद्धा, लोप पावलेली संत चळवळ, त्यात अज्ञानाची भर, शिक्षणाचा नसलेला गंध यामुळे समाज भरकटलेला होता. भारताला स्वातंत्र्य मिळूनही हैद्राबाद संस्थानात निजामी राजवट चालू होती. त्यामुळे माणसाला माणूस म्हणून महत्त्व दिले जात नव्हते. अशाच काळात एखादी व्यक्ती मृत पावली, एखादा आजार जडला तर त्याला देवी कोप समजून लोक पशुबळी, नरबळी द्यायचे. अशा प्रकारातून व्यक्तींची आर्थिक व मानसिक शोषण होत होते. अशा अनिष्ट रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धांनी समाजाला ग्रासलेले आहे. हे भगवानबाबांनी जवळून पाहून अनुभवले होते.

"अध्यात्माच्या क्षेत्रात बहुसंख्य संतांना माणसाच्या आध्यात्मिक उन्नतीशिवाय दुसरे काही नको असते ते केवळ आपल्या भक्तांच्या आध्यात्मिक जाणिवा कशा विकसित होतील तेवढेच पाहतात." असे भगवानबाबांच्या संदर्भात नागनाथ कोत्तापल्ले एका ग्रंथाच्या प्रस्तावनेत मांडतात. या मताशी निगडित समाजमनात असलेल्या रूढी व परंपरांचा न्यूनगंड बाजूला काढून त्यांनी लोकांना प्रथम आपलेसे केले व माणूस म्हणून जगण्याचे शिकवले. समाजात खोलवर रुजलेली अंधश्रद्धा स्वतः पुढाकार घेऊन नष्ट केली. कदाचित स्वतः कमी शिक्षण घेतल्याची खंत असल्याने या भरकटणाऱ्या समाजातील मुले-मुली शिक्षित झाली पाहिजेत. त्यांच्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे. त्यासाठी त्यांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून

दिली पाहिजे. अशा मुलांसाठी भगवानबाबांनी स्वतः पुढाकार घेऊन विद्यालये काढली, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शहराच्या ठिकाणी वसतिगृहे चालवली. भगवान शिक्षण मंडळाची स्थापना केली. भरकटू लागलेल्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले. ते सांगताना वेळप्रसंगी 'जमीन विका पण शिक्षण शिका' असा आधुनिक मूलमंत्र दिला. तसेच भयभीत-अस्थिर असलेल्या समाजाला आपल्या कौटुंबिक ताणतणावातून बाहेरच्या जगाचे दर्शन व्हावे. समाजात समाजकार्यासाठी दान-धर्म करण्याची वृत्ती अंगी निर्माण व्हावी यासाठी पंढरपूर, पैठण तीर्थक्षेत्री दिंड्या सुरू केल्या. त्या माध्यमातून समाजात एक प्रकारची जनजागृती करण्याचे काम संत भगवानबाबा यांनी केले. समाजात अनेक वृत्ती-प्रवृत्तीचे लोक अनुभवायला मिळत असल्याने अशा प्रकारच्या पाषाणहृदयी माणसांना मेणासारखे मऊ बनवण्याचे कार्य या दिंडीतून होईल. याच उद्देशाने भगवानबाबांनी नारायणगडावरून सर्वप्रथम दिंडी सुरू केली. त्यासाठी त्यांना गुरू बंकटस्वामी यांचे सहकार्य लाभले. मराठवाड्यातील खंडित होऊ लागलेल्या दिंड्यांना नवसंजीवनी देण्याचे काम भगवानबाबांनी केले.

**अंधश्रद्धा निर्मूलन कार्य**

भगवानबाबांवर गौतमबुद्ध, भगवान महावीर, महात्मा गांधी यांच्या अहिंसावादी विचारांचा प्रभाव पडलेला होता. त्यामुळे त्यांना शारीरिक, मानसिक, वाचिक अशी कुठल्याही प्रकारची हिंसा आवडत नसे. तत्कालीन काळात इंग्रज आणि निजाम सत्तेच्या दडपशाहीमुळे समाज डोंगरदऱ्यात पशुवत जीवन जगत होते. राना-वनातील पशुपक्षांची शिकार करून खाणे म्हणजेच अश्मयुगीन मानवासारखी अवस्था झाली होती. परिणामी निरर्थक रूढी-परंपरांचे पेव फुटले होते. ते सर्व करणे म्हणजे धर्मकार्य अशी धारणा समाजाची झाली होती. पशू-पक्षी, बळी देण्याची अघोरी प्रथा समाजात सर्रासपणे चालू होती. तंत्र-मंत्र, निष्कळ व्रतवैकल्ये, शाप, शकुन, अपशकुन, नवस-सायास, होम-हवन, भानामती, अंगारे-धुपारे, दोरी-गंडा, जादूटोणा, बुवाबाजी, अनिष्ट रूढी-परंपरा इत्यादी प्रथांनी अंधश्रद्धांचे समाजात पेव माजले होते. याविरोधोत कैकाडी महाराज, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज आदींनी लोकजागृतीच्या माध्यमातून चालू केलेले हे काम पुढे भगवानबाबांनी शेवटपर्यंत केले. भगवानबाबांनी पुजाऱ्यांचे व मांत्रिकांचे संगनमताने चोचले पुरवण्यासाठी त्यांनी निर्माण केलेले हे गौडबंगाल असल्याचे ते म्हणत. याविषयी वैजनाथ सांगळे म्हणतात

की, "गुलामाचा आणि गुलाम बनविणाऱ्यांचा धर्म हा एक असू शकत नाही. हे बाबांना ज्ञात होते. त्यामुळेच त्यांनी समाजातील विविध अडसर, अंधश्रद्धा व घातक विधी जाणीवपूर्वक बंद केल्या." एकंदरीत अविवेकी दृष्टिकोनातून आलेल्या या अघोरी प्रथा बंद झाल्या पाहिजेत. त्यासाठी त्यांनी कीर्तन-प्रवचन, सप्ताह, यात्रा यांच्या माध्यमातून परिवर्तन करून आणले. गोहत्या, पशू-पक्षांच्या हत्या बंदीचे निर्णय घेऊन ते अमलात आणण्याचेही कार्य केले.

**उपेक्षित वंचिताचा आधारवड**

समाजात अराजक परिस्थती निर्माण झाली होती. यामुळे गरीबांचे चौहूबाजूनी शोषण होत होते. ही परिस्थिती बदलण्यासाठी भगवानबाबांनी "गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर गोपिचंदनाचा टिळा, पंढरपूरची वारी या शिकवणुकीबरोबर मांसाहार आणि मद्यपान निषेध, परोपकार, सहिष्णूता यांचा पुरस्कार अशाप्रकारे संत परंपरेला शोभून दिसेल अशी माणुसकीची शिकवण देत असत." थोडक्यात जे लोक वाटमाऱ्या, चोऱ्या-दरोडे, लूट, मारामाऱ्या सारखे कृत्य करून आपले जीवन व्यथीत करत. त्यांच्यातील अज्ञान बाजूला सारून शिक्षणाच्या प्रवाहात आणले. एवढेच नाही तर भिल्ल, टकारी, पारधी यांसारखे लोकांमध्ये आपलेपणाचा विश्वास निर्माण करून स्वतःचे पाठीराखे, अंगरक्षक म्हणून नेमणुका केल्या व आपल्या सानिध्यात घेतले. काहींना तांगा चालवण्याची जबाबदारी दिली तर काहींना गावोगावच्या राखण्या दिल्या. त्यामुळे चोऱ्या करणारे लोकच मालकाच्या भूमिकेत वावरू लागले. या मोबदल्यात त्यांना गावशिवारातील शेतकऱ्यांना सालचंदी देण्याचे सांगितले. दरोडेखोरांना स्वतःच्या गडाच्या तिजोऱ्यांचे रखवालदार मालक म्हणून सांभाळण्याच्या जबाबदाऱ्या दिल्या. ही उपेक्षित वंचित असलेले लोकं आपल्यावरील भगवाबाबांचा विश्वास पाहून भांबावून जात व आपल्यावरील जबाबदाऱ्या प्राणापलीकडे सांभाळू लागले. परिणामी दुष्कृत्यातून बाहेर येण्यास मदत झाली.

समाजातील वंचित घटकांतील बहिरे, लुळे-पांगळे, मुके, आंधळे ज्यांचा कुणी वाली नाही अशा निराधारांना आश्रय देऊन मृदंग पखवाज, टाळ-वीणा, गायन यासारख्या गोष्टी शिकवून त्यांच्या जगण्यात रस रंग भरला. काहींना गडावरील धन-धान्यांच्या कोठारांचे प्रमुख म्हणून नेमणुका केल्या. अगदी नारायणगडावर असतानाही आणि नंतर भगवानगडावरही अशा लोकांचे आधारवड म्हणून आयुष्यभर त्यांची सेवा

भगवानबाबांनी केली. "गुरूवर्य भगवाबाबांनी भगवानगडाचा दैनंदिन कारभार राम व काशिनाथ नावाच्या दोघा आंधळ्यांवर सोपविला होता. तितरवणीचा सखाराम, खांब्याचा मुका सदाशिव, अवलियासारखा वावरणारा जहागिरदार यासारखी माणसे बाबांना प्रिय होती." एकंदरीत अपंगाच्या आयुष्यात भगवानबाबांच्या रूपाने सूर्य उगवला आणि त्यांचे आयुष्य प्रकाशमान झाले. संत भगवानबाबांच्या आयुष्यातील यांसारख्या व्यक्तिरेखा त्यांच्या जीवन जगण्याचा घटक बनून राहिल्या. ज्यांच्या शिवाय त्यांचे आयुष्यच पूर्ण होऊ शकत नाही.

**तंटामुक्ती कार्ये**

भगवानबाबांनी संत ज्ञानेश्वरांच्या संतोक्तीप्रमाणे कार्य केले. आधुनिकीकरणामुळे व्यक्तीजवळ भरपूर पैसा आणि साधनसंपत्तीचा संचय झाल्याने त्यांच्यातील गर्व समोर आले. अशा गर्वामुळे मारामाऱ्या, खून यासारख्या घटना झपाट्याने आजही आपल्या अवतीभोवती घडताना दिसतात. त्यांच्या अंगी असलेले काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर हेच भांडणांचे मूळ भगवानबाबांनी ओळखले. त्यातून ते वैयक्तिक स्वार्थासाठी एकमेकांची पिळवणूक करतात. हे कुठे तरी थांबले पाहिजे या दृष्टिकोनातून भगवानबाबांनी कीर्तनाच्या माध्यमातून लोकप्रबोधनाचे कार्य केले. याचा दाखला एका लोकगीताच्या माध्यमातून आजही समाजमनावर अधिराज्य गाजवत आहे.

असे कितीतरी तंटे स्वतः भगवानबाबांनी शांततेच्या मार्गाने मिटवले. याविषयी आपले मत व्यक्त करताना प्रभाकर सानप म्हणतात की, "गावागावातील, माणसा-माणसातील पिढ्याजात चालत आलेली वेर बाबांच्या मध्यस्थिने नाहीसे झालेली आहेत. कुटुंब कलहापासून विवाहापर्यंत सगळे सामाजिक प्रश्न त्यांनी सोडविले." महाराष्ट्र शासनाने अलिकडे 'तंटामुक्त गाव' मोहीम सुरू केली. मात्र भगवानबाबांनी त्यांच्या कितीतरी अगोदर पासून तंटामुक्तीची प्रत्यक्ष अंमलबजावणी कृतीतून करून दाखविलेली आहे. यावरून असेही म्हणता येईल की, 'तंटामुक्त गाव' मोहिमेचे आद्य प्रणेते भगवानबाबा हेच होते.

**जातभेद निर्मूलन कार्ये**

संत ज्ञानेश्वरांप्रमाणे 'हे विश्वची माझे घर' मानणारे भगवानबाबा होते. पृथ्वीवरील प्रत्येक जिवात परमेश्वर आहे. त्यामुळे कुणालाही आपल्यामुळे त्रास होणार नाही याची खबरदारी ते घेत. त्यांनी कधी

जातभेद धर्मभेद, उच्च निचपणा मानलेला आढळून येत नाही. साधू-संतांचे जीवन समता प्रस्थापित करण्यासाठी असते, हे भगवानबाबांकडे पाहिल्यानंतर लक्षात येते. "स्वतः भगवानबाबा जातीच्या पलीकडे गेलेले होते. त्यांनी भगवानगडाचे नेमलेले ट्रस्टी वेगवेगळ्या जातीमधील होते. याची नोंदही प्रा. सोनवणे यांनी केली आहे. त्यामुळे जातीबंधने ढिली होऊन काही बंधुत्वाची भावनाही त्यांच्यामुळे वाढीस लागल्याचे दिसते." अशा बहुरूपी विचारांचे व्यक्तिमत्त्व ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ कोत्तापल्लेनी आपल्या प्रस्तावनेत मांडले आहे. शिवाय भगवानबाबांनी आपल्या आयुष्याच्या शेवटी स्वतःचा वारस म्हणून आपल्या गुरूच्या म्हणजे बंकटस्वामीच्या वारसाला नेमून गुरूच्या ऋणातून मुक्त होण्याबरोबरच स्वजातीलाही बाजूला सारून जातीभेद निर्मूलनाचे काम केले. तसेच भगवानबाबांचा शिष्य समुदाय हा अठरापगड जातीतील आणि वेगवेगळ्या धर्मातील होता.

भगवानबाबांनी पशुहत्या बंद केल्यानंतर मुलाणी लोकांच्या रोजी-रोटीचा प्रश्न निर्माण झाला असता त्यांना वर्षानुवर्ष पडीक असलेल्या जमिनी कायमस्वरूपी कसण्यासाठी दान म्हणून मिळवून देऊन त्यांचा प्रश्न सोडविला. मुस्लीम बांधवांच्या आग्रहाखातर रमजान महिन्यात मुस्लीम बांधवांना नीवन जगण्याविषयीचे तत्त्वज्ञान सांगण्याचे काम केले. याशिवाय हिंदू-मुस्लीम-बौद्ध बांधवांचे लोक मिळून मिसळून आजही भगवानबाबांच्या पंढरपूरसाठी जाणाऱ्या दिडीचे आदर स्वागत करतात. या आगळ्या-वेगळ्या भगवानबाबांच्या गुण-वैशिष्ट्यांची पावती म्हणून त्यांच्यावर कित्येक मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, हिंदू बांधव भजने रचून म्हणत असत. त्याचेच उदाहरण म्हणून आळंदी-पंढरपूरचे वारकरी सय्यद बासुभाई यांनी काकडा भजनातून जनजागृती करून हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी काम केले. "मुस्लीम परिवारातील बासूभाई यांचे वडील सय्यद दगडूभाई हे गावातीलच ह.भ.प. अश्रूचा पाटील शेळके यांच्याकडे काम करीत असत. वडिलांसोबत बासुभाई हे शेळके यांच्या घरी नेहमी नात असत. ते संत भगवानबाबा यांच्या सानिध्यात आले. संताचे चरणस्पर्श त्यांना शेळके यांच्या घरी लाभले. संत भगवानबाबा यांनी आशीर्वाद दिल्यामुळे तेव्हापासून ते वारकरी संप्रदायाला मानू लागले."

एकंदरीत भगवानबाबांनी समाजातील आपापसातील मतभेद, कडवट जातीयवाद दूर व्हावा यासाठी एक अभिनव संकल्पना समाजात रुजवली. ज्यामध्ये विविध जाती-धर्मातील स्त्री-पुरुष, मुली-मुले त्यांना गुरू

मानत असत. पर्यायाने ते भगवानबाबांचे शिष्य ठरत व हे शिष्य आपापसात एकमेकांचे गुरू बहीण-भाऊ म्हणून बाबांच्या साक्षीने एकमेकांचा स्वीकार करत. तसेच सख्या बहीण-भावाच्या नैसर्गिक नात्यापेक्षाही अधिक निष्ठेने पाळत. एकमेकांच्या संकटकाळात, सुख-दुःखात खंबीरपणे उभे राहत. थोडक्यात, "जाती-जातीमधील, धर्मा-धर्मामधील तुटकपणा दूर करून सामाजिक एकरूपता व सामाजिक सौहार्द जपण्याचा हा आदर्श संस्कार होता." जो आजही मोठ्या निष्ठेने ग्रामीण भागात पाळल्या जातो.

**सारांश**

वारकरी संप्रदायामध्ये १२ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत अनेक संत मंडळींनी आपल्या साहित्यातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. समाजाला योग्य दिशा देणे, अंधः श्रध्दा, अनिष्ठ रुढी, परंपरा, देव धर्म, भोळेपणा सोडून विज्ञानवादी दृष्टिकोन स्विकारण्यास भाग पाडले, वाट चुकलेल्यांना योग्य मार्गदर्शन करणे, चांगले व वाईट शत्रू-मित्र ओळखण्यास शिकविणे, भविष्याकाळाची उज्वल स्वप्ने दाखविण्याचे महान कार्य संतांनी केले आहे. त्यांना दीनदुबळ्या समाजाबद्दल तळमळ वाटते. ते भेदभाव कधीच करीत नाहीत, ते समाजाला समानतेची, त्यागाची, बंधूभावाची, एकतेची शिकवण देतात. त्याचा देह समाज प्रबोधनासाठी सतत झिजत असतो. समाजाच्या भल्यासाठी त्यागाची अपेक्षा करतात. पाप-पुण्य, जन्म-मृत्यु, अंधः श्रध्दा यात खितपत न पडण्याची शिकवण देतात. अशा वारकरी संप्रदायात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार, संत कर्ममेळा, संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा, संत निठोबा, संत रामदास, संत बहीणाबाई इत्यादी संत मंडळींनी समाज उद्धारासाठी व समाज प्रबोधनासाठी आपल्या साहित्यातून मौलिक विचारधन दिले आहे. त्यांनी आपल्या अभंगातून व साहित्यातून हिंदू धर्मातील समाजव्यवस्थेत चालत असलेला देववाद, अधःश्रध्दा, अज्ञान, कर्मकांड या गोष्टीवर प्रहार करुन समाज प्रबोधन केले आहे.

या संत साहित्यामध्ये वंजारी समाजातील संतांचेसुद्धा फार मोठे योगदान राहिले आहे. यामध्ये श्री संत भगवानबाबा, श्री संत वामनभाऊ, श्री संत नारायण महाराज आणि श्री संत खंडुजीबाबा या संतांनी समाजातील अंधः श्रध्दा, अनिष्ठ रुढी, परंपरा, देव धर्म, भोळेपणा सोडून विज्ञानवादी दृष्टिकोन स्विकारण्यास भाग पाडले, वाट चुकलेल्यांना योग्य मार्गदर्शन करणे, सात्विक आहार करणे, अज्ञान दूर करण्यासाठी

शिक्षणाचा प्रधान्य देण्याच कार्ये केले. याशिवाय वंजारी समाजामध्ये ह.भ.प. संत नामदेव महाराज शास्त्री, ह.भ.प. डॉ. तुळशिराम महाराज गुट्टे, ह.भ.प. राधाताई सानप, ह.भ.प. अर्जून महाराज लाड, ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर, ह.भ.प. नथुराम बाबा केहाळकर, ह.भ.प. रामेश्वर महाराज गुट्टे, ह.भ.प. गोदावरीताई मुंडे, ह.भ.प. तुकाराम महाराज मुंडे, ह.भ.प. माऊली महाराज अरबूजवाडीकर इत्यादी संत समाजप्रबोधनाचे कार्ये करीत आहेत.

**संदर्भ**

१. सानप प्रभाकर (संपा.), 'भगवान महाराज चरित्र मालिका, नाथ मुद्रणालय, औरंगाबाद, प्र.आ. १९८२
२. मुंढे सुखदेव, 'कर्मयोगी भगवानबाबा', विकास प्रिंटर्स, उस्मानाबाद, प्र.आ. २०१३
३. मालकर अंजली, 'मराठवाड्यातील अभिजात संगित अर्थात देवगिरीची रागगाथा', सुमेरू प्रकाशन, डोंबीवली, प्र. आ. २००५
४. सोनवणे के. पी., गुण गाईन आवडी अर्थात गुरुवर्य भगवानबाबा, महिमा सायन पब्लिकेशन्स प्रा.लि., पुणे, प्र. आ. २०१८
५. राजेंद्र दर्डा (संपा.), 'दैनिक लोकमत (औरंगाबाद), शुक्रवार दि. १३ जानेवारी २०१७
६. कराड एकनाथ, 'समाजसुधारक राष्ट्रसंत भगवानबाबा', मुक्तरंग प्रकाशन, लातूर, प्र.आ. २०११
७. बोडखे जनार्दन, 'संत भगवानबाबा विजयादशमी विशेषांक २०१७',
८. श्री स्वामी शिवानंद तीर्थ ब्रह्मचर्य हेच जीवन, लाखनी बुक डेपो, मुंबई, १९७५
९. घुले राजकुमार, 'राजयोगी महंत भगवान बाबा', गणेश आर्ट प्रिंटर्स अहमदनगर, ३ एप्रिल २०११
१०. घुले राजकुमार पंढरीनाथ, श्री संत रत्नमाला, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव, प्रथमावृत्ती, २०२१